आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र.५९

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – रंजना दत्तात्रय मोरे,

वय – ४० वर्षे, व्यवसाय –शेती,

राहणार–वडझीरे, ता.पारनेर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>–**

आरोपी सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा वडझीरे येथे कर्मचारी होता त्यामुळे मी त्याला ओळखते. गौतम जाधव यास मी प्रथम बँकेत पाहीले होते. त्या बँकेत माझे ४/५ वर्षापासुन सेव्हींग खाते आहे. माझा खाते नंबर मला आठवत नाही. दि.९/३/२०२० रोजी माझे कांद्याचे साडे तीन लाख रुपये आले होते. मी बँकेत माझ्या पतीच्या खात्यावरील रक्कम एफडी करण्यासाठी माझ्या पतीसोबत गेले होते. त्यावेळेस गौतमजाधव याने आमच्या १०/१२ सहया पावत्यांवर घेतल्याहोत्या. त्यांनी आम्हाला पावती न्यायला उद्या या असे सांगितले होते. दि.२३/३/२०२१ रोजी माझ्या पतीच्या मोबाईलवर साडे तीन लाख रुपये कटल्याचा मेसेज आला. आम्हाला एफडीचे पैसे कट झाल्याबाबत मेसेज आल्याचे वाटले. त्यानंतर एफडीची मुदत संपल्यानंतर आम्ही पुन्हा बँकेत गेलो. बँकेतील विद्या मॅडमने आम्हाला सांगितले की तुमच्या खात्यात पैसे नाही. बँकेत मी व माझे पती गेलो होतो. आम्ही त्यांना पावती दिली असता बँकेतील मॅनेजर आम्हाला म्हणाले की दिलेली पावती बनावट आहे. त्यानंतर माझ्या पतीने एमआयडीसी, नागापुर शाखा येथील बँकेत तक्रार दिली. त्यानंतर मॅनेजर यांनी आम्हाला सांगितले की गौतम जाधव याने दिलेली पावती बनावट असुन तुमची फसवणुक झाली आहे. त्यानंतर दि.२७/३/२०२१ रोजी मी जबाब देण्यासाठी पो.स्टे.ला गेले. पोलीसांनी माझ्या व माझ्या पतीच्या १०/१२ सहया घेतल्या. मी माझी सही ओळखु शकते. आता मला नि.४७ वरील एफडीची पावती दाखवण्यात आली. त्या पावतीच्या मागिल बाजुस सही असुन ती सही माझीच असुन ती मी ओळखली. आरोपी गौतम जाधव आज न्यायालयात हजर आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः</u>**

पोलीसांना माझा जबाब दिल्यानंतर तो मी वाचला होता. दि.९/३/२०२० रोजी कांद्याचे पैसे आल्याबाबतच्या पावत्या आता माझ्याकडे नाही. माझा खाते नंबर ३१७१४९३३१७ असा आहे. (सदर साक्षीदाराने खाते क्रमांक हाताकडे बघुन सांगितला).

उलटतपास मध्यान्हापर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १९/०९/२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३, पारनेर.

**<u>उलटतपास मध्यान्हानंतर शपथेवर पुन्हा सुरुः</u>**

आता मला बँकेला दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत दाखवण्यातआली. ती तक्रार बँकेला मीच दिली होती. सदर तक्रारी अर्जाच्या प्रतीस ओळखीसाठी नि.६० देण्यात येते. त्या अर्जात नमुद मजकुर की दि.२३/३/२०२० रोजी रंजना दत्तात्रय मोरे या नावाने एफडी करण्यात आली होती, हा मजकुर बरोबर आहे.

प्रश्न– रिसीटवर अकाउंट नंबर चुकीचा टाकुन व सही चुकीची करुन आमची फसवणुक केली असा अर्जातील नमुद मजकुर बरोबर आहे का?

उत्तर– अकाउंट नंबर चुकीचा नाही. सहया चुकीच्या करुन फसवणुक केली होती.

हे म्हणणे खरे नाही की सदर अर्जात सहया कोणी केल्या याबाबत गौतम जाधवचे नाव नमुद नाही. त्या अर्जात गौतम जाधवचे नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.१०/३/२०२१ रोजीचा अर्ज केवळ माझ्या पतीने दिला व मी फक्त त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की दि.२७/३/२०२१ रोजी पोलीसांनी माझी जबाबावर फक्त सही घेतली व पोलीसांनी जबाब तयार करुन ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस मी बँकेत गेले त्यावेळी बँकेत इतर बँक कर्मचारी उपस्थित होते. हे मला सांगता येणार नाही की बँकेत पैसे काढण्यासंदर्भात किंवा जमा करण्यासंदर्भात मी बँकेत कॅशीयरशी भेटते. मी स्वतःहुन सांगते की माझे पती

व्यवहार बघतात. हे म्हणणे खरे आहे की दि.१३/३/२०२० रोजी एक वर्षाची जी पावती केली तिचा मुदत संपल्यानंतर विथड्रॉबाबत माझ्या पतीच्या मोबाईलवर मेसेज आला. हे म्हणणे खरे आहे की आम्हाला जी पावती मिळाली त्या पावतीवर माझ्यासमोर सहया झाल्या नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्यासमोर सहया झाल्या नसल्याने ती सही नेमकी कोणी केली याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की ज्यावेळेस आम्हाला पैसे कटल्याचा मेसेज आला त्यावेळी आम्ही बँकेत गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की दि.१० मार्च रोजीच्या अर्जामध्ये आम्ही बँकेचीच तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की दि.१० मार्च रोजीच्या अर्जामध्ये आम्ही गौतम जाधव यांच्या विरोधात कोणतीच तक्रार केली नाही.

प्रश्न– ज्यावेळेस तुम्ही बँकेत गेले त्यावेळी बँक मॅनेजर उघडे मॅडम यांच्याशी तुमची चर्चा झाली?

उत्तर– त्यांनी आम्हाला, तुम्हाला बनावट पावती दिली आहे असे सांगितले.

हे मला सांगता येणार नाही की त्यानंतर बँकेचे वरिष्ठ अधिकारी यांची व माझ्या पतीची भेट झाली.

प्रश्न– तुमच्या पतीची उघडे मॅडम व प्रकाश बोरुडे यांच्याशी देखील भेट झाली?

उत्तर– नंतर भेट झाली नाही. ज्यावेळेस आम्ही पावती मोडायला गेलो त्यावेळेस भेट झाली.

हे मला आठवत नाही की मी बँक अधिका–यांशी भेटल्यानंतर गौतम जाधव विरोधात पोलीसांना जबाब दिला. जे पैसे आम्ही दिले होते ते पैसे आम्हाला परत भेटले. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीस बँक अधिका–याने प्रलोभन दाखवल्याने आम्ही बँक अधिकारी सोडुन फकत गौतम जाधव यांच्याविरुध्द फिर्याद दिली. हे मला सांगता येणार नाही की बँकेचे शिक्के व पावत्या चोरी झाल्याबाबत बँकेने तक्रार दिली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की बँकेने एक वर्षानंतर आम्हाला पावती दिली व केवळ जास्त रक्कम मिळण्याकरीता मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आमची फसवणुक बँकेने केल्यामुळेच बँकेने आम्हाला ते पैसे परत दिले. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीची व प्रकाश बोरुडेची मैत्री असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.१० मार्च २०२१ रोजीच्या अर्जात गौतम जाधवचे नाव कुठेही नमुद नाही व बँकेच्या

सांगण्यावरुन मी आज गौतम जाधव यांचे नाव सांगत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १९/०९/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.